# मेट्रो कामासाठी रस्त्याच्या मध्यभागी घेतलेली जागा परत करुन रस्ता पुर्वपदावर आणण्यात सुरवात

पुणे २६ फेब्रुवारी २०११ : पुणे मेट्रोचे क्राम जवळपास २१ –३० टक्के पुर्ण झाले असुन , सर्व महत्वाचे सिविल क्रामासंबधी कॉट्रक्टसना सुरवात झालेली आहे . पुणे मेट्रोचा बराचसा उन्न्त भाग रस्त्याच्या मध्यभागी पिअर टाकुन बाधंण्यात येत आहे . अश्या पिअरचा पाया पाईल किंवा ओपन फौंडेशन या पदधतीने केला जातो. अशाप्रकारच्या पाया उभारणीसाठी रोड्च्या मध्यभागी साधरणता: ९ मिटर जागेची गरज भासते. रोड मध्यभागाच्या दोन्ही बाजुला ०४:५० मिटर जागा घेउन बॅरिकेड लावले जातात जेणेकरुन पिअरच्या पायाचे काम सुरक्षितरित्या पुर्ण केले जाउ शकते . व कामासाठी वापरण्यात येणारी यंत्रे पुर्ण क्षमतेने वापर करण्यात सुविधा होते. रस्त्याचा मध्यभागी काम करणे हे अंत्यत अव्हानात्मक असते. अशा प्रकारच्या कामासाठी रस्त्यातली दुभाजक काढावे लागतात , पादचारी पथाची रुंदी कमी अधिक करावी लागते . या व्यतिरिक्त जमिनिखालुन जाणाऱ्या ईलेक्ट्रिक तारा , पाण्याचे पाईप , सिवर लाईन , टेलिफोन लाईन ,ईत्यादी सुविधांचे स्थलांतर करण्याची गरज भासु शकते.

रस्त्याचा दुभाजकाजवळच्या दोंन्ही बाजुला ४:३०मी आणि ४:३० मी बॅरिकेडद्वारे तात्पुरत्या स्वरुपात जागा घेतल्यानंतर मेट्रो पहिले फौंडेशनचे काम पुर्ण करते त्यानंतर पिअर , पिअर आर्म व सेगमेंट लॉचिंगची कामे केली जातात. यांनतर रस्त्यातले बॅरिकेड काढण्यात येतात व रस्ता दुरुस्त करुन वाहनांसाठी खुला केला जातो . पुणे मेट्रोकामात सेगमेंट लॉचिंगची कामे प्रगतिपथावर आहे . पीसीएमसी ते स्वारगेट कॉरिडोरमध्ये साधारणत: ५४० मिटर लांबीच्या रोडवरचे बॅरिकेड काढण्यात आले असुन रस्ता पुर्वीसारखा वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे . तसेच वनाज ते रामवाडी या मार्गिकेत एकून ७५० मी मार्गावर बॅरिकेड हलविण्यात आले असुन रस्ता पुर्ववत करण्यात आला आहे . पीसीएमसी ते स्वारगेटच्या मार्गिकेत हिन्दुस्तान एंटिबायोट्किसच्या फॅक्टरी समोरील रस्त्याच्या ठिकाणी व वनाज ते रामवाडी या मार्गिकेत गुजरात सोसायटी ते क्रुष्णा हॉस्पीटल ,आंनद नगर मेट्रो स्टेशन ते आयडीयल कॅालनी बस स्टॉप , आयडीयल कॅालनी मेट्रो. स्टेशन ते एरडवंणा पोलिस चौकी , गरवारे कॅालेज गेट ते सावरकर स्मारक याठिकाणची बॅरिकेड हटविण्यात आली आहेत . यामुळे वाहतुक पुर्वपदावर आणण्यात सुरवात झाली आहे वाहतुकीसाठी रोड खुला करण्यासाठी रोड पुर्णपणे दुरुस्त करण्यात आला आहे .

रस्त्याचे दुभजके पुर्ववत बसविले आहेत व ईतर कामे करण्यात आली आहेत. पुणे मेट्रो नागरिकांना होणाऱ्या असुविधेबद्दल नेहमी जागरुक असुन काम झाल्याबरोबर अत्यंत तत्परतेने बॅरिकेड हटविण्यात येत आहे व रस्ता पुर्वपदावर आणण्यास प्रयत्न करत आहे .